# BDC LIBRARY

## New Paper Clipping

**A.Y. 2024-2025**

पुण्य नगरी

# जीवनात कधीही हार मानू नका: पाटणकर

पाटण / प्रतिनिधी

जीवनात कधीही हार माणू नका. प्रत्येक आव्हान हे नवीन शिक्षणाची आणि विकासाची संधी आहे. आपल्या आयुष्यात महत्वाचे क्षण समजून घ्या. प्रत्येक क्षण हा नवीन सुरुवातीची संधी आहे, असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी केले. ते नवागताचे स्वागत आणि नियतकलिक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते .



कार्यक्रमात बोलताना अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण, प्राचार्य शिरीष पवार व मान्यवर.

यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य शिरीष पवार, पर्यवेक्षक दीपक दाभाडे, प्रा. सतीश गायकवाड, प्रा पौर्णिमा मोरे आदीसह विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते. अमरसिंह पाटणकर पुढे म्हणाले, स्वतःचे मूल्य ओळखा, स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

संजीव चव्हाण म्हणाले, देशाचे चांगले नागरिक बनायचे असेल तर आवडीचे क्षेत्र निवडा. चांगली पुस्तके वाचा आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी अभ्यास करा. आपले आयुष्य घडवून देशाचे आदर्श नागरिक व्हा असे म्हणाले.

प्रास्ताविक डीबी दाभाडे ,परिवेक्षक कनिष्ठ महाविद्यालय यांनी केले. आभार एस एस लाड यांनी मानले तर सूत्रसंचालन टी.आय. पाटणकर, एस.के.संकपाळ यांनी केले.

Satara Edition Edition
Jul 12, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com